MHLA090004292026

## निशाणी क्र.१ खालील आदेश

अर्जदार यांनी सदरचा अर्ज सुपुर्दनामावर वाहन परत मिळणेकामी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांच्या मालकीची मोटर सायकल क्र.एम.एच.२४ बी.ए.८४८९ हा अपराध क्र.२८४/२०२५ मध्ये जप्त करण्यात आला. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे सदरील मुद्देमाल पोलिस स्टेशनला पडून राहिल्यास त्याचे नुकसान संभवते. अर्जदार यांना सदर वाहन दैनंदिन व्यवहारासाठी आवश्यक असल्याने सुपूर्तनामावर मिळणेकामी विनंती केली आहे.

३. तपास अधिकारी यांनी आपले म्हणणे नि.क्र.५ वर दाखल करून सदर वाहन सोडून देण्यास त्यांनी हरकत दर्शवली. तसेच, सरकरी वकील यांनी आपले म्हणणे नि.क्र.६ वर दाखल करून त्यांनी देखील हरकत दर्शवली नाही.

४. अर्जदार यांना दैनंदिन व्यवहारात सदरील वाहानाची आवश्यकता असल्याने त्यांना पुढीलप्रमाणे अटी व शर्तींवर वाहनाचा ताबा देण्यात यावा.

१. अर्जदार यांनी सदरील वाहन संबंधीत पोलिस स्टेशन व कोर्ट येथे चौकशीकामी रु.५०,०००/- चा बॉन्ड अदा करावा.

२. अर्जदार यांनी पुढील आदेश होईपर्यंत सदरील वाहन कोणालाही हस्तांतरीत करू नये.

५. वरील प्रमाणे अटी व शर्तींवर अर्जदाराला वाहनाचा ताबा देण्यात येतो. त्याप्रमाणे यादी संबंधीत पोलीस ठाणेला अदा करण्यात यावी.

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.05.15 15:35:47 +0530

**उदगीर.** **(श्री. व्ही. आर. घराळ)**

**दि.१५/०५/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उदगीर.**